जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट धुळेचे

# जयहिंद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, धुळे

## माहिती पत्रक -२०२०-२१

UID No:27020501707
Jr. College Index No .14-05-009





Address: Jaihind Colony, Deopur
Dhule ,424002
Phone No:02562-221036

Web site :www.jaihindjuniorcollege.org
Email Id : jaihindjrc@gmail.com

जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट धुळेचे

# जयहिंद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज , धुळे


इयत्ता १२ वी त उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे

## अभिनंदन ! अभिनंदन ! अभिनंदन !



आदरणीय चेअरमन
डॉ दादासाहेब अरुण झुलालराव साळुंके

| कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|
| ८७.७५ | ९८. ३३ | ९९. ७८ |



आदरणीय व्हा. चेअरमन
भाऊसाहेब प्रमोद गुलाबराव पाटील

### विज्ञान

| अ . न | विद्यार्थ्यांचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | वराडे तेजस दिलीप | ६२४ | ९६. ०० |
| २ | पानट आदित्य आशिष | ५७६ | ८८. ६२ |
| ३ | देसले विव्यानी पाटीलभाऊ | ५७५ | ८८. ४६ |

### वाणिज्य

| अ. न | विद्यार्थ्यांचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | लुल्ला वैष्णवी महेश | ६०४ | ९२. ९२ |
| २. | वधवानी संजना कैलास | ५८३ | ८९. ६९ |
| ३ | देवरे महेश किशोर | ५७६ | ८८. ६१ |

### कला

| अ.न | विद्यार्थ्यांचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १. | भोईटे दिशा संजय | ५३६ | ८२. ४३ |
| २. | पाटील भाग्यश्री पिंटू | ५२५ | ८०. ७६ |
| ३ | जाधव हर्षद दिनेश | ४९७ | ७६. ४६ |





## जयहिंद कनिष्ठ महाविद्यालय एक दृष्टिक्षेप आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये :

जून १९७५ ला महाराष्ट्र शासनाने आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान व कला वर्ग चालविण्यास प्रथम मान्यता देऊन १९७७-७८ पासून वाणिज्य शाखेचे वर्ग चालविण्यास परवानगी दिली .वाणिज्य शाखेत मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमाचे वर्ग स्वतंत्रपणे घेतले जातात .

## कनिष्ठ महाविद्यालयांची वैशिष्ट्ये :

→हे कनिष्ठ महाविद्यालय जयहिंद नगर , पांझरा नदी काठच्या निसर्गरम्य परिसरात उभारलेले आहे .

→आमचे सर्व वर्ग अनुदानित आहे.स्वतंत्र अभ्यासिका -अद्ययावत व सुसज्ज संगणक प्रयोगशाळा

→विज्ञान , वाणिज्य व कला विभागात अनुभवी , कर्तव्यदक्ष , आणि मेहनत घेऊन दरवर्षी जिल्हा स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या मुलांसाठी सतत काम करणारे सर्व शिक्षकवृंद

→ कनिष्ठ विद्यालयाच्या सर्व शैक्षणिक कामाचा दररोज आढावा घेणाऱ्या महाविद्यलयाच्या प्राचार्या सौ.सरला पाटील मॅडम , उपप्राचार्या सौ बोरसे मॅडम आणि जयहिंद संस्थेचे सर्व संचालक मंडळ

→इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी लॉकडाऊन च्या या अवघड काळात मार्च २०२० पासून दररोज जयहिंद E पॅटर्न द्वारे ऑनलाइन क्लास च्या द्वारे १२ वीच्या विद्यार्थ्यांना ३५% टक्के सिल्याबस पूर्ण करून प्रत्येक महिन्याला ऑनलाईन MCQ टेस्ट CET पॅटर्न प्रमाणे घेतल्या जात आहेत .या E पॅटर्न ला संपूर्ण धुळे जिल्ह्यात नावलौकिक मिळून पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला .

→विद्यार्थ्यांना MHCET ( Engineeraing) व मेडिकल च्या पूर्व परीक्षेसाठी महाविद्यालयाच्या ऑनलाइन टेस्ट पोर्टल द्वारे स्वतंत्र आणि पारदर्शक सिस्टम

→विद्यार्थी ,महाविद्यालय आणि शिक्षक यांच्या रोज वार्तालाप होण्यासाठी शिक्षक -विद्यार्थी मोबाइल अप ची निर्माती कार्यान्वित असून त्यामुळे महत्वाच्या सूचना,अभ्यासाचे स्टडी मटेरियल वैयक्तिक आणि ग्रुप ने विद्यार्थ्यांना पाठवले जाते . ही यंत्रणा फेब्रु . २०२० मध्ये जयहिंद संस्थेने कार्यान्वित केली आहे . यावर पालक आपल्या मुलाचे महाविद्यालय सुरु झाल्यावर हजेरी रोज बघू शकतात. पालक आपल्या मुलाचा प्रोग्रेस रिपोर्ट बघू शकणार .

→विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र वसतिगृह ,विद्यार्थिनीच्या सुरक्षितेसाठी जयहिंद संस्थेचे कडक व्यवस्था आणि सुव्यवस्थापन

→शैक्षणिक क्रीडा , सामाजिक , सांस्कृतिक , वादविवाद , स्पर्धा परीक्षासाठी विशेष मार्गदर्शन

→ गरीब होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तकपेढीतून जयहिंद संस्थेच्या वतीने वर्षभर घरी अभ्यासासाठी पुस्तके देण्याची सोय

→महाविद्यालयाच्या परिसरात स्वतंत्र दिवस /रात्र सीसीटीव्ही द्वारे काळजीपूर्वक नियंत्रण ठेवून गैर प्रकार रोखण्याची व्यवस्था व सेंट्रलाइज नियंत्रण

# कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रवेशासंबंधीचे नियम :

- महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग निर्णय क्रमांक एच .एच .सी १०९७ ( १९४४) /९७/ -१ उमशी -१ मंत्रालय विस्तार विभाग भवन , मुंबई ४०००३२ दि. ४/६/१९९७ च्या नियमानुसार प्रवेश दिला जाईल प्रथम ( F.Y.J.C)वर्ष साहित्य /वाणिज्य /विज्ञान प्रवेश विद्यार्थी **MS Board of Secondary** च्या नाशिक,पुणे , मुंबई अमरावती , कोलापूर , नागपूर,औरंगाबाद , लातूर या विभागीय मंडळामार्फत १० वी परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्यासाठी पात्रता दाखल्याची गरज नाही मात्र **Leaving Certificate** अत्यंत आवश्यक.

- जे विद्यार्थी भारतातील इतर राज्यातील किंवा मान्यताप्राप्त मंडळाची एस एस सी परीक्षा पास असतील तर त्यांनी बोर्डाकडून मिळणारा ठराविक नमुन्यातील अर्ज भरून सचिव,म . रा . माध्य . व उच्च माध्य .मंडळ , नाशिक यांचेकडे पाठवावा व आवश्यक ते योग्य प्रमाणपत्र **ELIGIBILITY** मिळवावे .त्याशिवाय त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित होणार नाही .

- विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी निवडावयाचे विषय हे त्या-त्या शाखेतील उपलब्धतेनुसार प्रवेश अर्जावर नमूद केलेल्या नियमाप्रमाणेच निवडावेत . त्यात योग्य तो बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. प्राचार्य/प्राचार्या व जयहिंद संस्था संचालक मंडळाला राहील.

- कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्याचे/नाकारण्याचे अधिकार प्राचार्य /जयहिंद संस्था संचालक मंडळ यांच्याकडे असून ज्या प्रवेशासाठी शाशकीय शिक्षण खात्याची अंतिम मान्यता असेल तो प्रवेश त्या मान्यतेनंतरच अधिकृत धरला जाईल (म. रा माध्य ./ उच्च माध्य . शिक्षण मंडळ ,नाशिक) कनिष्ठ महाविद्यालयाच्या कारभार विषयक बाबींसाठी अथवा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण उपक्रम संदर्भात उदभवणाऱ्या वादग्रस्त प्रश्नासंबंधी अंतिम निर्णय म. विभागीय शिक्षण उपसंचालक (DYD ) नाशिक आणि जयहिंद संस्था संचालक मंडळाच्या यांच्या आदेशाने राहील .

## सरकारी शिष्यवृत्ती :

केंद्र/सरकारद्वारा पुढीलप्रमाणे विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती , फी सवलत दिल्या जातात . त्याची माहिती कार्यालयातून घेऊन तशी सूचना फलकावर लावण्यात येते विद्यार्थ्यांनी मुदतीच्या आत अर्ज केले पाहिजे .

१. ई .बी.सी सवलत

२. स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांसाठी शिष्यवृत्त्या

३. बी,सी . स्कॉलरशिप

४. प्राथमिक शिक्षकांच्या मुलांसाठी फी सवलत

५. शारीरिक दृष्ट्या अपंगांसाठी शिष्यवृत्ती

६. विशेष गुणवत्तावर्धक विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत पारितोषिक दिली जातात.

७. भारत सरकार शिष्यवृत्ती -११ वी /१२ वी साठी

८. फ्री शिप सवलत ११ वी व १२ वी साठी

९. राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती - असा कोणताही अर्ज कार्यालयात दिल्यावर त्याची रीतसर पोहोच घ्यावी .

## फी संबधीचे नियम व माहिती --

१. सरकारी धोरणास अनुसरून विद्यालयात फी घेतली जाते .सत्र ( Term ) सुरु झाल्याबरोबर वर्षाची पूर्ण फी भरण्याची पद्धत ऍडमिशन फॉर्म मध्ये दिली आहे .

२. प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्गासाठी एकूण १२ महिन्याची शिक्षण फी भरावी लागेल .शैक्षणिक फी संपूर्ण एका हफ्त्यात भरावी लागेल .

३. ग्रंथालय अनामत रक्कम ( लायब्ररी डिपॉझिट) ठरवून दिल्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला भरावी लागेल.

४. ग्रंथालयातून पुस्तक घेतल्यास ७ दिवसात परत करावे .तसे न केल्यास पुढील प्रत्येक दिवसास १० रु, प्रमाणे दंड आकारण्यात येईल .

५.परीक्षा फॉर्म भरताना विद्यार्थ्याला वर्षाची सर्व प्रकारची फी भरणे आवश्यक आहे .त्याशिवाय फॉर्म स्वीकारला जाणार नाही .

६. प्रवेश घेतांना स्वतःचा पासपोर्ट आकाराचे २ फोटो आणावेत .

## विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम :

→प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विषय, वर्ग, तुकडी देण्याचे अथवा न देण्याचे अथवा फेरबदल कण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील .

→महाराष्ट्र राज्य बाहेरील अथवा राज्यातून ( CBSE /ICSE ) बोर्डातून शाळांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महा.राज. माध्य . ,महा. व उच्च शिक्षण मंडळाकडून पात्रता दाखल देणे आवश्यक असते . म्हणून प्रवेशाच्या वेळेस Migration Certificate व TC देणे आवश्यक आहे . सादर कागदपत्रे न दिल्यास प्रवेश मिळणार नाही .

→प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व विषयांच्या तासांना नियमाप्रमाणे व वक्तशीरप्रमाणे उपस्थित राहिले पाहिजे .

→विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयाचे स्वाध्याय ( ट्युटोरिअल) वेळच्या वेळी लिहून पूर्ण केले पाहिजे .

→महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व ऑनलाइन -ऑफलाइन - लेखी परीक्षांना बसून विद्यार्थ्याने प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखवली पाहिजे .गैरहजर विद्यार्थ्यांना दंड आकारला जाईल .

→ ८० टक्क्यापेक्षा कमी उपस्थिती असलेल्या तिमाही, सहामाही,व पूर्व परीक्षेला न बसणाऱ्या विद्यार्थ्याला वार्षिक परीक्षेस बसू दिले जाणार नाही व त्यास फी संबंधी सवलत किंवा इतर आर्थिक मदत मिळणार नाही .

→महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने लेमिनेटेड ओळखपत्र महाविद्यालयतर्फे आठ दिवसाच्या आत करून घेणे आवश्यक आहे . महाविद्यालयाच्या आवारात वावरतांना आपले ओळखपत्र नेहमी जवळ बाळगावे आणि केव्हाही मागितल्यास ते त्याने दाखविले पाहिजे .ओळखपत्र हरवल्यास १०० /- दंड व नव्या ओळखपत्राची फी वेगळी द्यावी लागेल .

→चालू असलेल्या वर्गात आपल्या वागण्याने कुठल्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही अशी खबरदारी विद्यार्थ्याने व्यक्तिशः व सामुदायिकरीत्या घेतली पाहिजे .

→विद्यार्थ्यांचा गणवेश -पोशाख महाविद्यालयाने ठरवलेला , शिस्तमान्य व नीटनेटका असावा .त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांचे वर्तन सभ्यतेचे असावे .

→एखाद्या विद्यार्थ्यांचे वर्तन महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे, . असे प्राचार्यांचे मत झाल्यास अशा विद्यार्थ्यास कोणतेही कारण न सांगता महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल .महाविद्यालय सुरु होण्यापूर्वी , सुटल्यानंतर परिसरात रेंगाळत राहू नये .

→महाविद्यालयांत विद्यार्थ्यांनी मोबाइल आणू नये . आणल्यास तो जप्त केला जाईल व १०० / रु. दंड आकारण्यात येईल .अन्यथा प्रवेश रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल .

## फी बाबत सवलती :

महाराष्ट्रातील मागासलेल्या वर्गाच्या ( हरिजन,नवबौध्द,विमुक्त जाती-जमाती भटक्या जाती)विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना लायब्ररी डिपॉझिट ,लेब्रॉटरी डिपॉझिट व कॉलेजची विहित फी भरावी लागेल .

२)महाराष्ट राज्यातील ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १५००० /च्या आत आहे अशा विद्यार्थ्यांना व प्राथमिक शिक्षकाच्या एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षेत शे. ४५ पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या मुलांना प्रवेश घेताना लायब्ररी डिपॉझिट , विज्ञान डिपॉझिट , विज्ञान शाखेसाठी भरावेत .वरील सवलती फक्त महाराष्ट्र राज्यात कायम राहणाऱ्यांसाठी आहे .

३)वेळोवेळी बदललेल्या शासकीय परिपत्रकाची कार्यवाही होईल .ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १५००० / च्या आत आहे अशा आर्थिक दृष्ट्या मागास ( ई .बी .सी ) विद्यार्थ्यांसाठी नियम .

→फी संबंधीच्या माहितीत निर्देशित केल्याप्रमाणे जी फी सरकार कडून मिळत नाही तीच व तेवढीच फक्त त्यांच्या कडून घेतली जाईल .

→सरकारकडून मिळणाऱ्या फी चा कोणताही भाग विद्यार्थ्यांकडून आगाऊ घेतला जाणार नाही व अशी भरलेली फी प्रवेश रद्द केल्यास परत मिळणार नाही

# जयहिंद कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान कार्यशाळा

भौतिकशास्त्र विभाग



COMPUTER- IT DEPT



रसायनशास्त्र विभाग



जीवशास्त्र विभाग

